# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्र.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायायोजना करण्याबाबत.**

**वाचावे** - 1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005.

2. साथ रोग अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांची आधिसुचना कोरोना2020/प्र.क्र.58/आरोग्य5, दि.14/3/2020
4. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील अधिसुचना क्रमांक डीएमयु2020/ सीआर/डीएसएम-1 दिनांक 3 एप्रिल 2020
5. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील अधिसुचना क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीएसएम-1 दिनांक 15 एप्रिल 2020
6. दिनांक 18/04/2020 रोजी च्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दिलेले निर्देश
7. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील आदेश क्रमांक डीएमयु /2020/ सीआर-92 / डीएसएम-1 दिनांक 17 एप्रिल 2020
8. इकडील आदेश क्रमांक आव्यमपु/कार्या19अ/328/2020 दिनांक 20/04/2020

| क्र. आव्यमपु/कार्या 19अ/338/2020 | **दुरुस्ती आदेश** | अहमदनगर दि.22/04/2020 |
|---|---|---|

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायादा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 8 च्या आदेशान्वये उदयोग/ औदयोगीक आस्थापना (सरकारी व खाजगी दोन्ही) कार्यान्वित करण्याबाबत आदेश करण्यात आले होते.

त्याअर्थी, संदर्भ क्र.8 च्या आदेशातील मुद्दा क्रमांक 2 मधील अ व ब नुसार

"अ) उदयोग/ औदयोगीक आस्थापना यांनी त्यांच्या आस्थापनावरील व्यक्तींना निवास व अनुषांगिक बाबींची व्यवस्था त्यांच्या कंपनीच्या आवारातच करावी. **ही रद्द करण्यात येत आहे."**

तसेच ब) उदयोग/ औदयोगीक आस्थापना यांनी त्यांच्या आस्थापनावरील व्यक्तींना एकदाच कामाच्या ठिकाणी हजर होण्यासाठी बसेस ची व्यवस्था करावी. हे करतांना Social Distancing तत्वाचे काटेकोर पालन करावे." **ऐवजी** असे वाचावेः-

***"ब) उदयोग/ औदयोगीक आस्थापना यांनी त्यांच्या आस्थापनावरील व्यक्तींना कामाच्या ठिकाणी ये - जा करण्यासाठी बसेस ची व्यवस्था करावी. हे करतांना Social Distancing तत्वाचे काटेकोर पालन करावे."***

तसेच अटी व शर्तीमधील मुद्दा क्रमांक 1 नुसार

"1) संदर्भ क्रमांक 7 चे आदेशामधील मुद्दा क्रमांक 15 मध्ये नमूद केलेप्रमाणे वरील उदयोग/ औदयोगीक आस्थापना (सरकारी व खाजगी दोन्ही) पैकी अ.क्र.1, 2 व 5 यांनी http://permission.midcindia.org या संकेतस्थळावर माहिती भरुन उदयोग सुरु करणेबाबत परवानगी घ्यावी. तसेच उर्वरीत उदयोग / औदयोगीक आस्थापना यांनी मुद्दा क्रमांक 17(ii) मध्ये नमूद केलेप्रमाणे व्यक्तींना एकदाच कामाचे ठिकाणी हजर होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी प्राप्त करुन घ्यावी." **ऐवजी** असे वाचावे.

***"1) संदर्भ क्रमांक 7 चे आदेशामधील मुद्दा क्रमांक 15 मध्ये नमूद केलेप्रमाणे उदयोग/ औदयोगीक आस्थापना (सरकारी व खाजगी दोन्ही) यांनी http://permission.midcindia.org या संकेतस्थळावर माहिती भरुन उदयोग सुरु करणेबाबत परवानगी घ्यावी."***

तसेच अटी व शर्तीमधील मुद्दा क्रमांक 2 नुसार

"2. वरील सर्व उदयोग / औदयोगीक आस्थापना यांना त्यांच्या कंपनीच्या आवारामध्येच त्यांच्या आस्थापनांवरील व्यक्तींच्या निवास व अनुषांगिक बाबींची व्यवस्था करणे बंधनकारक राहील जेणेकरुन त्यांची दैनंदिन आवागमण होणार नाही. " ***ही अट रद्द करण्यात येत आहे.***

तसेच अटी व शर्तीमधील मुद्दा क्रमांक 3 नुसार

"3) उदयोग/ औदयोगीक आस्थापनांवरील व्यक्तींना कामाचे ठिकाणी हजर होण्यासाठी वैयक्तीक पासेस दिले जाणार नाहीत. उदयोग/ औदयोगीक आस्थापना यांनी व्यक्तींना **एकदाच** कामाच्या ठिकाणी हजर होण्यासाठी बसेसची व्यवस्था करावी आणि त्या बसेसकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पासेस प्राप्त करुन घ्यावे. बसेस वापरण्यापुर्वी पुर्णपणे निर्जंतुकीकरण करुन घ्याव्यात. बसेसमध्ये सॅनिटायझर्स ठेवण्यात यावे. बसमध्ये चढतांना व उतरतांना सॅनिटायझर्स वापरुन हात धुणे बंधनकारक राहील. हे करतांना Social Distancing तत्वाचे काटेकोर पालन करावे.' **ऐवजी** असे वाचावे.

***"3) उदयोग/ औदयोगीक आस्थापनांवरील व्यक्तींना कामाचे ठिकाणी ये - जा करण्यासाठी वैयक्तीक पासेस दिले जाणार नाहीत. उदयोग/ औदयोगीक आस्थापना यांनी व्यक्तींना कामाच्या ठिकाणी ये - जा करण्यासाठी बसेसची व्यवस्था करावी आणि त्या बसेसकरीता http://permission.midcindia.org या संकेतस्थळावर माहिती भरुन पासेस प्राप्त करुन घ्यावे. बसेस वापरण्यापुर्वी पुर्णपणे निर्जंतुकीकरण करुन घ्याव्यात. बसेसमध्ये सॅनिटायझर्स ठेवण्यात यावे. बसमध्ये चढतांना व उतरतांना सॅनिटायझर्स वापरुन हात धुणे बंधनकारक राहील. हे करतांना Social Distancing तत्वाचे काटेकोर पालन करावे."***

कोणतीही व्यक्ती / संस्था / संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

जिल्हाधिकारी अहमदनगर

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

प्रत -
1) जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी.
2) आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी.
3) प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक
4) पथक प्रमुख (सर्व), जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर
5) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर / श्रीरामपुर
6) महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
7) उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
8) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांना प्रसिध्दीकामी.
9) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) / तालुका दंडाधिकारी (सर्व) यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी.